# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक 19/11/2019**

**सभा सुचना क्रं. 8 दु.4.30 वा.**

| | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| 1. | मागील मा. विशेष सर्वसाधारण सभा अनुक्रमे दि. 31/08/2019 व दि. 11/09/2019 आणि दि.18/09/2019 रोजीचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव. | ठराव :- मागील मा. विशेष सर्वसाधारण सभा अनुक्रमे दि. 31/08/2019 व दि. 11/09/2019 आणि दि. 18/09/2019 रोजीचे कायम केलेले इतिवृत्त दुरस्तीसह मान्य करण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 2. | प्रश्नोत्तरे | निरंक |
| 3. | शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव. | निरंक |
| 4. | श्रीम. कल्पना किसन दिवा हिस वारसा हक्काने सफाई कामगार पदावर नोकरी देणेबाबत. | निर्णय/ठराव:- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती -सी, चंदनसार, विरार विभाग आस्थापनेवरील कर्मचारी कै. किसन मोहन दिवा सफाई कामगार यांचे दिनांक 24/01/2019 रोजी निधन झालेले असुन त्यांचा पश्चात त्यांची पत्नी श्रीमती कल्पना किसन दिवा हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक 21 ऑक्टोबर, 2011, शासन परिपत्रक दिनांक 26 फेब्रुवारी, 2014 व शासन निर्णय दिनांक 11 मार्च, 2016 मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (यज्ञेश्वर पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 5. | श्री अंबालाल महिडा (सफाई कामगार) हयानां स्वेच्छा निवृत्ती मिळणेबाबत. | निर्णय/ठराव:- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती- एच, नवघर-माणिकपूर आस्थापनेवरील कर्मचारी श्री. अंबालाल मणिलाल महिडा, सफाई कामगार यांना दि. 28/11/2019 रोजी मध्यान्होत्तर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 चा नियम 66 (1) अन्वये स्वेच्छा सेवानिवृत्त |

| | | |
|---|---|---|
| | | करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच श्री. अंबालाल मणिलाल महिडा, सफाई कामगार यांना स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर दयावयाचे अनुषंगिक लाभ अदा करणेस आजची ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 6. | **श्री संजय वाघेला (मुकादम) हयांना स्वेच्छा निवृत्ती मिळणेबाबत.** | निर्णय/ठराव:- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती- एच, नवघर-माणिकपूर आस्थापनेवरील कर्मचारी श्री. संजय सोमा वाघेला, मुकादम यांना दि. 30/11/2019 रोजी मध्यान्होत्तर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 चा नियम 66 (1) अन्वये स्वेच्छा सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच श्री. संजय सोमा वाघेला, मुकादम यांना स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर दयावयाचे अनुषंगिक लाभ अदा करणेस आजची ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (नितीन राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 7. | **वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील डि.पी. रोड विकसित करणे कामी मे.जयप्रयाग इन्फास्ट्रक्चर प्रा.लि. हयांचे मार्फत प्रायोगिक तत्वावर तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.** | ठराव :- उपरोक्त सादर केलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली व सदरचा विषय तूर्तास स्थागित ठेवावा अशी सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 8. | **प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील वसई भाबोळा मुख्य रस्त्यावरील बिग बाजार समोरील रस्त्यावर आर.सी.सी. कल्व्हर्ट बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव** :- सदर विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली आर. सी. सी. बॉक्स कल्वर्टसाठी एकदाच तांत्रिक सल्लागाराकडून विविध रुंदीच्या रस्त्यासाठी डिझाईन घेवून त्यानुसार कल्वर्टची कामे प्रस्तावित करावीत तसेच टी बॉक्स कल्वर्ट चा विषय आहे. त्यांचे तांत्रिक सल्लागार यांना एकदाच तांत्रिक शुल्क अदा करणेंत यावे. विषयांकीत कामी रु. 91,59,712/- किंमतीच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. विहीत प्रणालीनुसार निविदा प्रक्रीया करणेस त्या अनुषंगाने येणाऱ्या ईतर अनुषंगीक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (मनिष वर्तक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 9. | **प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील भाबोळा बंगली रस्त्यावर तांदुळ बाजार समोर रस्त्यावर आर.सी.सी.कल्वर्ट बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली आर. सी. सी. बॉक्स कल्वर्टसाठी एकदाच तांत्रिक सल्लागाराकडून विविध रुंदीच्या रस्त्यासाठी डिझाईन घेवून त्यानुसार कल्वर्टची कामे प्रस्तावित करावीत तसेच टी बॉक्स कल्वर्ट चा विषय आहे. त्यांचे तांत्रिक सल्लागार यांना एकदाच तांत्रिक शुल्क अदा करणेंत यावे. विषयांकीत कामी रु. 1,08,31,248/- किंमतीच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. विहीत प्रणालीनुसार निविदा प्रक्रीया करणेस त्या अनुषंगाने येणाऱ्या ईतर अनुषंगीक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (मनिष वर्तक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 10. | **वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रस्तावित 40.00 मी रिंग रोड जोडणारा व पालघर तालुक्याला जोडणारा सागरी किनारा मार्ग (Costal Road) मौजे-चिखलडोंगरे व डोंगरे तसेच वसई विरार शहर महानगरपालिकेतुन वगळलेले आणि विशेष नियोजन प्राधिकरण मध्ये असलेले मौजे-कोल्हापुर येथील 40.00 मी, 30.00मी, 20.00मी व 12.00रुंदीचा प्रस्तावित करुन वसई विरार उपप्रदेशाच्या मंजूर विकास आराखडयामध्ये अंतभुर्त करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना आधिनियम 1966 चे कलम 37 (1) अन्वये करावयाच्या कार्यवाही बाबत** | **ठराव :-** वरील प्रस्तावाप्रमाणे वसई विरार उपप्रदेशाच्या मंजूर विकास आराखडयातील शासन निर्णय क्र. टिपीएस.1231/1548/सी.आर.234 (सी) दि.09/02/2007 अन्वये भागास मंजूर केलेले असून तो दिनांक 15/03/2007 पासून अमंलात आलेला आहे. तसेच शासनाने वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतून प्रस्तावित 40.00 मी. रिंग रोड ला जोडणारा व जेठीला व पालघर तालुक्याला जोडणारा सागरी किनारा मार्ग (Coastal Road) मौजे-चिखलडोंगरे व डोंगरे तसेच वसई विरार शहर महानगरपालिकेतून वगळलेले आणि विशेष नियोजन प्राधिकरणा मध्ये असलेले मौजे-कोल्हापूर येथे प्रस्तावित करुन विरार उपप्रदेशाच्या मंजूर विकास आराखडयामध्ये अंतर्भूत करणेसाठी व वसई विरार शहर महानगरपालिका महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार करणेस ही सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 11. | **वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती डी वॉर्ड क्र.48 मध्ये तुळींज येथील स्मशानभुमी येथे शौचालय व शांतता कक्ष बांधणे कामी अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करणेत आली सदर जागा ही वनक्षेत्रापैकी असल्याने सदर जागा म.न.पा कडे वर्ग करुन किंवा वनविभागाची संमती घेवुन पुढील कार्यवाही करणेस तसेच उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास रक्कम रु. 79,63,849/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (निलेश देशमुख) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 12. | **प्रभाग समिती अ मधील विरार प प्रभाग क्रमांक 32 मध्ये खारोडी पुल ते अपंग पुनर्वसन केंद्र येथे संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे याकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.** | ठराव :- सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रु.1,68,79,809/-) या खर्चास ही सभा प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे. व सदर कामी ई-निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.<br><br>**अनुमोदक :- (सखाराम महाडीक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 13. | **खोलसापाडा 1 लघु पाटबंधारे योजना तालुका वसई, जिल्हा पालघर हा प्रकल्प वसई विरार शहर महापालिकेस पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित करणे व प्रकल्पाच्या अद्ययावत किंमतीनुसार आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.** | ठराव :- उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा होवून असे ठरविण्यांत आले की, खोलसापाडा ता. वसई, जि.पालघर लघुपाटबंधारे प्रकल्प वसई - विरार शहर महानगरपालिकेस पिण्याच्या पाण्यासाठी 100 % आरक्षीत करण्यास व सदर प्रकल्पाच्या अंदाजे रू. 110.04 कोटी खर्चास हि सभा आर्थिक व प्रशाकिय मान्यता देत असून सदर आरक्षण बदलाचा प्रस्ताव पाटबंधारे विभागामार्फत शासनास सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या प्रकल्पाचे अद्यावत तयार करण्यात आलेले सविस्तर अंदाजपत्रक व सामंजस्य कराराचा मसुदा मागविण्यास हि सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (सुनील आचोळकर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 14. | **स्वच्छ भारत अभियान (नागरी ) घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 अंतर्गत घनकचरा विलगीकरण मोहीम राबविणेसाठी डस्टबीन खरेदी करणे करीता प्रशासकीय व वित्तीय मान्यतेबाबत.** | ठराव :- उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा होवून असे ठरविण्यांत आले की, स्वच्छ भारत अभियान (नागरी) घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 अंतर्गत घनकचरा विलगीकरण मोहीम राबविणेसाठी आय. आय. टी. / शासनमान्य संस्थेमार्फत गुणवत्ता/दर्जा तपासणी करून चांगल्या गुणवत्तेचे/दर्जाचे 15000 डस्टबीन खरेदी करणेकामी रू. 3,82,20,000/- इतक्या खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत असून यापुढे आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी लागणाऱ्या वाढिव डस्टबीन खरेदीकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देते आहे. तसेच सदर कामी वाढीव मागणीनुसार येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत.<br><br>**अनुमोदक :- (सखाराम महाडीक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 15. | **सौ. अनुजा आनंद किणी, उपमुख्य लेखा व वित्ती अधिकारी यांना महानगरपालिकेच्या सेवेत कायम स्वरुपी सामावुन घेणेबाबत निर्णय घेणे.** | **निर्णय/ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिकेत शासनाचे वित्त विभागाकडील सौ. अनुजा किणी, सहा. लेखाधिकारी (गट -ब) हया प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत. मा.आयुक्त,वसई -विरार शहर महानगरपालिका यांचे आदेशानुसार दि. 19/06/2018 पासून सौ. अनुजा किणी यांना मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदाचा कार्यभार सोपविण्यात आला होता. त्याकरीता मा. स्थायी समितीने मंजूरी दिलेली होती. त्या पदाचे काम अत्यंत जबाबदारीने पार पाडलेले असून मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे आदेशानुसार दि. 27/03/2019 पासून सौ. अनुजा किणी यांचेकडे उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदाचा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.सौ. किणी महानगरपालिकेत रुजू झाल्या नंतर पुनश्च: जून 2019 मध्ये पायाची शस्त्रक्रिया केलेली आहे. त्यामुळे श्रीमती किणी यांचा लांबचा प्रवास अशक्य असल्याने व त्यांचे निवासस्थान ही विरार येथे असल्याने त्यांनी महानगरपालिकेच्या सेवेत कायमस्वरूपी समाविष्ट करून घेण्याबाबतची दि. 4/11/2019 रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली आहे.उक्त सर्व बाबी विचारात घेता, सौ. अनुजा किणी हया महाराष्ट्र वित्त लेखा संवर्ग परिक्षा उत्तीर्ण असुन त्यांना लेखा संवर्गातील वर्ग- 2 च्या पदाचा पाच वर्षाचा अनुभव आहे. महानगरपालिकेच्या दि. 09/09/2014 च्या मंजुर आकृतीबंध व सेवा प्रवेश नियमानुसार उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदावर शासन मान्यतेच्या अधिन राहून श्रीमती किणी यांना महानगरपालिकेच्या सेवेत कायम स्वरुपी सामावुन घेणेस आजची ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 16 | **पावसाच्वा पाण्यामुळे भातशेती व सुकी मासळी मच्छिमारांना झालेल्या नुकसानी प्रकरणी नुकसान भरपाई देणेबाबत चर्चा करुन धोरण निश्चित करणे व आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे.** | **ठराव/निर्णय :-** सदर प्रस्तावावर सभेत सविस्तर चर्चा करणेत आली ऑक्टोबर 2019 महातील अतिवृष्टी तसेच त्यादरम्यान आलेल्या क्यार व महाचक्री वादळामुळे आणि प्रदीर्घ लाबलेल्या पावसामुळे, वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील शेतकरी, बागायतदार व मत्सव्यवसायदारांची देखिल अपरिमित आर्थिक हानी झालेली आहे<br>सबब शासनाच्या महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग शासन निर्णय, क्रमांक:- सीएलएस 2019/प्र.क्र.191/म-3 मंत्रालय,मुंबई-400032 दिनांक 19 नोव्हेंबर 2019 ला अधिन राहुन महानगरपालिका परिक्षेत्रातील बाधित शेतकरी फळ, फुल बागायतदार व रहिवाशी क्षेत्रात पाणी साचल्याने सदनिका धारकाचे सामानाचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे. अशा सर्व बाधित नुकसानग्रस्तांचे तात्काळ पंचनामे संबंधित शासन यंत्रणेमार्फत करण्याकरीता शासनास विनंती करणेत यावी व या सर्व बाधित नुकसानग्रस्तांना तात्काळ जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळणेसाठी शासनास विनंती करणेत यावी अशी आजची सर्वसाधारण सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- (सुदेश चौधरी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 17. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर स्वीय सहाय्यक, महापौर कार्यालय या पदावर करार पध्दतीने नेमणूक करणेबाबत निर्णय घेणे.** | **निर्णय/ठराव:-** वसई-विरार शहर महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, 2014 मध्ये या पदांसाठी सेवाप्रवेश नियम विहित आहेत.महाराष्ट्र महानगरपालिकेच्या अधिनियमाच्या कलम 51 (1) नुसार मा. महासभेच्या मान्यतेने तसेच कलम 54 (2) मधील तरतुदीनुसार कर्मचारी निवड समितीच्या शिफारशीने सदर पद तात्पुरत्या स्वरुपात सहा महिन्यांकरिता थेट मुलाखतीद्वारे (Walk In Interview) भरणेस आजची मा. महासभा मान्यता देत आहे.<br><br>**अनुमोदक :- (कल्पेश मानकर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

**नगरसचिव**
**वसई विरारशहर महानगरपालिका**